
# सूरज गाताडे

# तू माझा सांगाती



# तू माझा सांगाती...!

# हे पुस्तक विनामूल्य आहे

# पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# तू माझा सांगाती...!

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

तू माझा सांगाती...!
सूरज काशिनाथ गाताडे
स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१
रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२
ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com
मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797
फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140
इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : २४ सप्टेंबर २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# "तू माझा सांगाती...!"

**(विज्ञानकथा)**


# लेखक - सूरज काशिनाथ गाताडे

**स्क्रिन रायटर्स असोसिएशन मेंबरशिप नंबर - 416 112**

# पूर्वीची प्रकाशित पुस्तके (अनुक्रमे)

१) द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

२) डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजिकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

३) दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

४) द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

५) फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजिकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

६) अ हेवी प्राईझ् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf


७) डेडली मिटिंग्स् - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/deadly_meeting_wagh_suraj_gatade.pdf

८) एजंट - X - (सायंटिफिक/मिस्ट्री/एक्शन/सायकॉलॉजिकल/थ्रिलर)


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/agent_x_suraj_gatade.pdf


सूरज गाताडे
द पॅरासाईट



सूरज गाताडे
दि डेथ ऑफ लिंकन्स मदर



सूरज गाताडे
अ हेवी प्राईझ


सूरज गाताडे
दे किस्ड बाय मिस्टेक


सूरज गाताडे
डेथ विल


सूरज गाताडे


सूरज गाताडे


सूरज गाताडे
एजंट एक्स
X

प्रस्तावना -



नमस्कार, 'द पॅरासाईट' नंतर पुन्हा एक विज्ञानकथा घेऊन आलो आहे. 'द पॅरासाईट'ला ईसाहित्यच्या वाचकांनी खूप प्रेम दिलं. तसंच प्रेम 'तू माझा सांगाती...!' या कथेलाही मिळेल अशी आशा करतो... जवळजवळ दीड वर्षांहून अधिक काळानंतर ही विज्ञानकथा लिहिली आहे. खरं तर रोबोट्स, किंवा एलियन्स या विषयावर लिहायचं नाही असं मी ठरवलं होतं. कारण विज्ञानकथा प्रकारात या गोष्टी खूप वेळा... खूप वेळा म्हणण्यापेक्षा असंख्य वेळा वापरल्या आहेत. नव्वद टक्के विज्ञानकथा यांच्या धर्तीवरच असतात... आणि म्हणूनच मी कटाक्षाने यांच्यावर लिहिणे टाळत आलो... पण 'नाओकी उरासावा' या माझ्या आवडत्या लेखकाची 'प्लूटो' ही जापनीज ग्राफिक नोवेल (मांगा) वाचत असताना मला मग रोबोट्सवर लिहिण्याचा मोह झाला आणि तो मला काही आवरता आला नाही... शिवाय ते वाचत असतानाच माझे दुसरे आवडते लेखक व दिग्दर्शक 'सत्यजित रे' यांच्या 'अनुकूल' या कथेवर आधारित दिग्दर्शक सुजॉय घोष यांची 'अनुकूल' याच नांवाची एक शॉर्टफिल्म मागील वर्षी पाहिल्याचं आठवलं. त्या कथेपासूनही मी प्रभावित झालो होतोच... त्यामुळं मोह टाळता आला नाही...

सो 'अनुकूल' व 'प्लूटो' पासून प्रेरित होऊन 'तू माझा सांगाती...!' ही नवीन कथा घेऊन आलो आहे. या कथांची ही कॉपी किंवा त्यांचा हा अनुवाद नाही, तर ही पुर्णतः स्वरचित कथा आहे. आशा आहे ही कथा आपल्याला आवडेल. आपल्या प्रतिक्रिया

नक्की कळवा. काही चुका आढळल्या तर तेही सांगा म्हणजे पुढं मला सुधारणा करता येतील. आपण कथेचा आनंद घ्याल अशी आशा करतो...

तसेच नेहमीच मोलाची साथ दिल्याबद्दल सुनील सामंत सर आणि ई - साहित्य टीमचे अनेक आभार.

धन्यवाद...!


नांव - सूरज काशिनाथ गाताडे.

पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव, ता. हातकणंगले,

जि. कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सएॅप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

**Disclaimer -**

Kindly be noted that, This story is purely a work of fiction. And has nothing to do with the real life incidents. It is Inspired from 'Satyjit Ray's story 'Anukul' and 'Naoki Urasawa's 'Pluto'. Though it's truly a genuine and authentic work by me and not a Copy or Translation of above mentioned stories. This story is a tribute to these Masters...

If you find any anomalies and errors, please let me know. It will help me to improve the story for other readers. Hope you all will like the story... Thank you...!

प्रस्तुत कथा, ईसाहित्य प्रतिष्ठान टीम व

वाचकांना समर्पित -

*"Nothing Can Be Born From Hatred...!"*

*- Gesicht (Pluto)*

"हातातला विळा टाक आणि शरण ये! आय रिपीट! थ्रो दि वेपन अँड सरंडर!"

...

"ऑफिसर्स, सिन्स द नॉन-ह्यूमन डजन्ट ओबे! मेक एन ओपन फायर!"

"फाय्...!"

..............................................................................................

....

"होल्ड द फायर! इफ यू फायर ऑन इट! इट विल बी द वायलेशन ऑफ दि युनिव्हर्सल लॉ ऑफ नॉन-ह्यूमन बिईंग्स!"

"स्टॉप! सुपिरिअर्स डोन्ट वॉन्ट अस टू शूट इट!"

...

"नॉन-ह्यूमन थ्र्यू द वेपन. अरेस्ट इट अमिडीएट्ली!"

.

.

.

**वर्ल्ड्‌स क्रिमिनल कोर्ट ऑफ नॉन-ह्यूमन -**

"जेव्हा आम्ही जनार्दन सारंग याच्या घरी पोहोचलो, तेव्हा ते त्यांच्या वनराईत पडले होते आणि हा रोबोट त्यांच्या समोर उभा होता, हातात विळा घेऊन. त्याचे हात व हातातील विळा जनार्दन सारंग यांच्या रक्ताने माखला होता. आपण हे समोरील स्क्रिनवर पाहू शकता..."

खूनाचा आरोप असणाऱ्या रोबोट विरुद्ध जबानी देताना त्याला कॅप्चर करणाऱ्या ऑफिसर्सचा टीम कमांडर जजना सांगत होता. लँग्वेज कन्व्हर्टींग डिव्हाईसच्या माध्यमातून कोर्टात उपस्थित सर्वांना त्यांच्या-त्यांच्या भाषेत त्या लोकांना ऑफिसर काय बोलतोय ते त्याच क्षणी अनुवादित होऊन ऐकू येत होतं.

त्याचं बोलणं थांबल्यावर जजसहित त्या कोर्टात उपस्थित सर्वांच्या नजरा त्या व्हर्च्युअल स्क्रिनवर स्थिरावल्या.

ऑफिसर्सच्या प्रोटेक्टिंग सूट्‌समध्ये असणाऱ्या मिनी कॅमेराज मध्ये जे-जे काही रेकॉर्ड झाले होते, ते त्या फिरत्या स्क्रिनवर सगळ्यांना पहायला मिळत होते...

**स्क्रिनवर -**

एक माणसा सारखा दिसणारा साधारण साडे पाच फूट उंचीचा डॅमेज झालेला रोबोट (ह्युमनॉईड) हातात विळा घेऊन उभा होता.

खाली पासष्ट वर्षांचे जनार्दन सारंग रक्ताच्या थारोळयात पडले होते.

आपल्या कमांडरच्या आदेशानुसार त्याच्या सह इतर नऊ ऑफिसर्सनी आपल्या गन्स समोरील रोबोटवर ताणल्या...

त्याचवेळी वायरलेस वरून वरिष्ठांचे आदेश आल्यावर फायरिंग हॉल्ट करण्यात आले. रोबोटने हातातील शस्त्र त्यागले होते. विळा खाली असलेल्या फावड्यावर पडलेला स्पष्ट आवाज झाला. इतक्या तणावपूर्ण वातावरणात सुद्धा इतकी शांतता होती, की विळाचा व फावड्याचा टण्णकार सर्व ऑफिसरच्या कानात घुमला.

कमांडरने त्याच्यातील एका ऑफिसरला पुढं जाण्याची खूण केली. तसा तो ऑफिसर पुढं झाला आणि त्याने त्याच्या इलेक्ट्रॉशॉक वेपनने रोबोटच्या चार्जिंग पॉईंटवर ओव्हर चार्जड् शॉक दिला आणि तो रोबोट डिसफन्गशन होऊन खाली कोसळला.



"जसं की मान्यवर जज व ज्युरी मेम्बर्सनी पाहिलं, हा रोबोट आपल्या मालकाला मारताना दिसत आहे..." जबानी देणाऱ्या कमांडरला मध्येच थांबवत एक ज्युरी मेंबर मध्येच थांबवले. तो म्हणाला,

"यावरून या रोबोटने त्यांना मारले आहे हे सिद्ध होत नाही!" तो त्याच्या भाषेत बोलला होता.

"यावर एकच उपाय आहे, माननीय जज साहेबांनी रोबोटच्या इंटेरोगेशनची व त्याची मेमरी चिप स्कॅन करण्याची परवानगी द्यावी." कमांडर म्हणाला.

"इंटरनॅशनल रोबोट राईट्स लॉ नुसार रोबोटच्या इच्छेविरुद्ध आपण त्याची मेमरी नाही चेक करू शकत!" रोबोट राईट्सची सुरक्षा पाहणाऱ्या व विक्टरची केस लढत असलेल्या रोबोट प्रोसिक्युटरने रोबोट्स लॉ आर्टिकल 26 ची सर्वांना आठवण करून दिली.

कोर्टकडूनच विक्टरला हा वकील दिला गेला होता. आज या जगात माणसासोबतच रोबोट्ससाठी देखील समान नागरी कायदे तयार केले गेले आहेत. एका माणसाला जे अधिकार आहेत, ते सर्व रोबोट्सना देखील लागू असल्याने कोणत्याही रोबोटला मनमानी शिक्षा करता येत नाही...

आणि म्हणूनच ही साधारणशी केस इतकी जटिल होऊन बसली होती. विक्टरने खून केला आहे हे समोर होतं, पण ते सिद्ध करता येत नव्हतं...

विक्टर; सर्वांच्या दृष्टीकोनातून जनार्दन सारंग यांचा मेड रोबोट! त्यामुळे तो कोणाला इजा करणे शक्य नाही, पण तरी त्याने आपल्याच एम्प्लॉयरला जीवे मारले होते! का...? कोणालाच माहीत नाही!

प्राथमिक चौकशीत विक्टरने काहीच सांगण्यास नकार दिला होता. आणि कायदाने त्याला तसा अधिकार दिल्याने कोणी त्याला सत्य सांगण्यास बाध्य करू शकत नव्हतं आणि म्हणून त्याला सरळ कोर्टासमोर उभा करण्यात आलं होतं... पोलिसांनी त्यांच्याकडील फुटेजच्या आधारे ही केस उभी करण्याचा प्रयत्न केला होता. पण तसेही काही होताना दिसत नव्हते!

इथेही कायदा आडवा येतच होता. विक्टरची मेमरी व्हिज्युअल रुपात पाहिली, तर सत्य समोर येणार होते. पण सरळ होतं, की विक्टर तशी परवानगी देणार नव्हता!

विक्टर... हे नांव जनार्दन सारंग यांनीच त्या रोबोटला दिले होते. दोन वर्षांपूर्वी त्यांनी एका ऑन-लाईन स्टोअरमधून तो विकत घेतला होता.

विक्टरच्या येण्याने जनार्दन सारंग यांचा एकटेपणा दूर झाला होता. त्यांचे विस्कळीत झालेले रुटीन त्यांनी नव्याने तयार केलेलं होते.

विशेष म्हणजे दोघांच्या आवडी निवडी खूप जुळत होत्या म्हणूनच जनार्दन सारंग यांच्या तो खूप आवडीचा झाला होता. दोघांमध्ये खूप चांगली व घट्ट मैत्री झाली होती. या रोबोटच्या येण्याने जनार्दन सारंग यांच्या आयुष्यात आनंद परत आला होता, म्हणून त्यांनीच या रोबोटला विक्टर हे नांव दिलं होतं...

विक्टर; दि विक्टरी ऑफ जॉय... जनार्दन्स विक्टरी ऑफ जॉय...! खूप वर्षांनंतर...

पण त्यांच्या आयुष्यात आनंद घेऊन येणाऱ्या या विक्टरनेच त्यांना जीवे मारले होते... का...? माहीत नाही...

तो काही 'वॉर रोबोट' नाही! आणि जरी असता, तरी पण वॉर रोबोटला सुद्धा माणसांना किंवा इतर रोबोट्सना मारण्याचा अधिकार नाही! वस्तुतः अलीकडे युद्ध बंदच झाली आहेत... शेवटचं युद्ध होऊन काहीशे वर्षं होऊन गेली आहेत... त्यामुळे जी काही युद्ध रोबोट्स बनवली जात आहेत, ती फक्त देशांच्या सीमा सुरक्षेसाठी! मास डिस्ट्रक्शनसाठी रोबोट्स प्रोडक्शनवर पिस क्रिएटिंग युनियन कौन्सिलने कधीच बंदी घातली आहे. आणि म्हणूनच कोणत्याच रोबोटला कोणालाही मारणं शक्य नाही. त्यांना तसं बनवलंच जात नाही...!

रोबोटिक्सचे हे नियम व कायदे तसेच आहेत जसे आपले संविधान असते. रोबोट्सना त्याचा अधिकार आहे तसेच काही कर्तव्यं आणि जबाबदाऱ्याही आहेत.

हे 'रोबोट कॉस्टिट्युशन' सर आयझॅक असिमोव्ह यांच्या तीन लॉजचा आधार घेऊन बनवले गेले आहेत...

Isaac Asimov's "Three Laws of Robotics"

1) A robot may not injure a human being or, through inaction, allow a human being to come to harm.

2) A robot must obey orders given it by human beings except where such orders would conflict with the First Law.

3) A robot must protect its own existence as long as such protection does not conflict with the First or Second Law.

**अनुवाद -**

**आयझॅक असिमोव्हचे "रोबोटिक्सचे तीन नियम"**

१) एखादा रोबोट एखाद्या माणसाला इजा पोहोचवू शकत नाही किंवा त्याच्या निष्क्रियतेद्वारे माणसाला इजा होऊ देऊ शकत नाही.

२) रोबोटने मनुष्यांनी दिलेल्या ऑर्डरचे पालन केले पाहिजे जिथे अशा ऑर्डरचा प्रथम कायद्याशी विरोध नाही.

३) जोपर्यंत प्रथम किंवा द्वितीय कायद्याशी परस्पर विसंगत येत नाही तोपर्यंत रोबोटने स्वतःच्या अस्तित्वाचे रक्षण केले पाहिजे.

म्हणजे मग काय जनार्दन सारंग यांच्याकडून विक्टरला काही धोका होता का? पण अशा परिस्थितीत देखील तो जनार्दन सारंग यांना मारण्याची परवानगी त्याचं संविधान त्याला देत नाही... मग त्यानं जनार्दन सारंग यांना का व कशासाठी मारले?

जो कायदा विक्टरला अधिकार देत होता, तोच कायदा हे देखील म्हणत होता, की "Ignorance of law is no excuse."

म्हणजे जर तुमच्यावर अन्याय झाला असेल आणि तरी तुम्ही गप्प बसलात, आणि गरज पडल्यावर वेळाने आपण आपल्यावर अन्याय झालाय अशी तक्रार केली, तर कायदा तुम्हाला न्याय मिळवून देण्यात काही मदत करत नाही! याला 'स्टेच्युट ऑफ लिमिटेशन्स' म्हणतात. भारतात खूनासारख्या गुन्ह्यात हा लॉ वर्क करत नाही. पण ही केस भारतात नाही, तर

इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टीस हाताळत होते. त्यामुळे कदाचित ही गोष्ट कुणाला दहा - बारा वर्षांनी समजली असती आणि मग कोणी विक्टर विरुद्ध गुन्हा दाखल केला असता, तर त्याला काहीच शिक्षा न्यायालयाकडून केली गेली नसती. आणि तो गुन्हा करूनही सुखरूपच सुटला असता.

खरं तर पुरावे मिळाले नाहीत, तर तो तसाही मुक्तच होईल... हा विक्टर खूप धूर्त असला पाहिजे असा निष्कर्ष कौन्सिलने काढला. भारतीय संविधानातील आर्टिकल 20 नुसार कोणत्याही आरोपीला त्याच्याविरुद्ध साक्ष देण्यास सक्ती केली जाऊ शकत नाही. याचा अर्थ शांत राहण्याचा पूर्ण अधिकार संविधानानेच विक्टरला दिला आहे. आणि सर्व देशाच्या कॉन्स्टिट्यूशनचा मान राखणं हे इंटरनॅशनल कोर्टला भाग असल्याने त्यांना विक्टरवर काही सक्ती करता येत नव्हती. त्यामुळे चौकशी समितीही विक्टरवर बोलण्यासाठी दबाव टाकू शकत नव्हती... के करायचं ते त्यांचं त्यांनाच करावं लागणार होतं... बहुदा संविधानाची सर्व माहिती विक्टरला असावी आणि तो त्या तरतुदीचा पुरेपूर वापर करून घेतोय असे इन्वेस्टीगेशन कौन्सिलला वाटत होते... शिवाय या सर्व संस्थांना भीती अशी होती, की...

बाकीचे जाऊ देत, उद्या यानेच आपल्या विरुद्ध युद्ध पुकारले, तर इतर रोबोट्स त्याच्या आवाहनाखाली एकत्र येतील आणि असे झाले, तर आपली काही खैर नाही ही भीती सर्वांनाच भेडसावत होती.

विक्टरनेच खून केलाय हे सिद्ध करता येत नसले, तरी खून तर झाला होता. आणि तो पण वेळेत नोंदवण्यातही आला होता... जनार्दन सारंग यांच्या एका शेजाऱ्याने जनार्दन सारंग यांना मरून पडलेले व त्यांच्या बाजूला विक्टर विळा घेऊन उभा हे दृश्य सर्वांत आधी पाहिले होते. आणि त्यानेच पोलिसांना बोलावले होते. जनार्दन सारंग मरून खूप वेळ झाला होता. नक्कीच सांगायचं झालं, तर दहा तास! तरी तेवढा वेळ विक्टर त्यांच्या मृतदेहाच्या समोर तो रक्तालेला

विळा घेऊन उभा होता. जमिनीवरचं व गवतावर साचलेलं रक्त वाळलं होतं. आणि तसं ते विक्टरच्या हातातील विळयावरचं सुद्धा...

पण खून करून देखील विक्टर इतका वेळ तो तिथेच का उभा होता? का नाही तो पळून गेला? कोणती गोष्ट होती, जी त्याला तेथे थांबवून ठेवण्यास बाध्य करत होती...?

जनार्दन सारंग यांच्या शेजाऱ्याने ती घटना पाहिली त्यावेळी विक्टरची नजर त्याच्यावर पडली होती. आपल्याही जीवाला धोका होईल म्हणून तो जीव तोडून तेथून पळाला होता.

पण नंतर स्वतःच्या जीवाची भीती न बाळगता जनार्दन सारंग यांच्या शेजाऱ्याकडून वेळेत गुन्हा नोंदवला गेला होता, म्हणून मग झालेल्या गुन्ह्याकडे स्वतः कोर्टच कसं काय दुर्लक्ष करणार होतं? आणि तेही इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टीस...

कारण ही घटना दिसते तितकी साधी नक्कीच नव्हती. एका रोबोटने आपल्या नियमांचं उल्लंघन केलं होतं. त्यामुळे हा एक जागतिक प्रश्न होऊन बसला होता... कुणी सांगावं; उद्या हेच रोबोट्स कायदे, नियम उलथवून लावतील आणि हा मानव जातीसाठी मोठा धोका ठरेल. आधीच ते माणसासारखे बनत चालले आहेत, त्यात माणसाचे दूर्व्यवहारदेखील त्यांच्यात आले व ते मॅलफन्कशन झाले, तर आज आपण त्यांना नोकर म्हणून वागवतोय, उद्या ते आपल्याला गुलाम बनवतील...!

माणसाला आधीच हयात असलेल्या इतर प्रजातींसोबत कधी जुळवून घेता आलेलं नाही, आणि त्यावर आता हे संकट...

विक्टरसारखं उद्या सर्वच रोबोट्स वागू लागले, तर क्राईम रेट्स मोठ्या प्रमाणात वाढतील... ही पण एक भीती... माणसानं रोबोट्सना आर्टिफिशियल इंटेलिजन्स देऊन व कायद्यामध्ये आपल्या सोबतचं स्थान देऊन हे 'मॅन मेड डिजास्टर' तर ओढवून घेतलं नाही ना...?

पण रोबोट्स खोटं वागत नाहीत! खोटं बोलत नाहीत! त्यांना तसंच बनवलं गेलंय. म्हणून तर विक्टरने गप्प बसण्याचा मार्ग अवलंबला होता...

माणसांकडून कोणी मारलं गेलं, तर त्याला 'सेंटन्स टू डेथ' ही शिक्षा सुनावली जाते. पण रोबोट्स?... त्यांना कुठली शिक्षा देणार?... रोबोट्ससाठी तशी तर काही तरतूदच नाहीए! तसा काही कायदाच नाही. कारण रोबोट्स कोणाला मारण्यासाठी बनवलेच गेलेले नाहीत...

केस लगेचच न्यायालयासमोर उभी राहिली होती, आणि संपूर्ण जगाचे लक्ष या घटनेकडे लागून राहिले होते...

प्रस्तुत बातमी समजताच काही आततायी लोकांनी विनाकारण आणि अनाठायी भीती पोटी काही रोबोट्सना फोडून टाकले होते. यात काही समाज विघातक घटक होतेच. म्हणजे या लोकांना समाजाशी काही देणं घेणं नसतं. फक्त तोडफोड करून आणि दुसऱ्याला इजा करून यांना आसुरी आनंद घ्यायचा असतो. अशाही बऱ्याच लोकांनी मानवतेच्या रक्षकांचा बुरखा ओढून निष्पाप रोबोट्सना तोडून टाकले होते. रोबोट्सच्या डेव्हलपमेंट व इफिशियन्सीमुळे नोकऱ्या गेलेले लोकही या घटनेच्या आडून आपला राग रोबोट्सवर काढू लागले.

तशात काही विरोधी राजकारणांनी स्वयें यात उडी घेतली. कोणाच्याही आमंत्रणाशिवाय! आणि आपल्या राजकीय पोळया भाजून घेण्याच्या नादात लोकांच्या मनातील रोष अधिकच भडकवण्याचे काम हे तथाकथित ज्ञानी व समाज हितदक्ष लोक करू लागले. फ्रीडम ऑफ

स्पीचच्या नावाखाली हे वाट्टेल ती बरळू लागले. ज्यातलं आपल्याला काही कळत नाही असेही काही, खरंतर, बरेच लोक यात सामील झाले होते...

शांतताप्रिय सामाजिक विचारवंतांनी याविरुद्ध आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. त्यांनाही द्रोही ठरवून बेदम मारण्यात आलं...

कायद्यात मॉबने मिळून काही गुन्हा केला आणि त्यात कोणी मारले गेले, तर त्या बद्दल काहीच शिक्षेची तरतूद नव्हती. त्यामुळे या लोकांना कायद्याअंतर्गत अडवणं शक्य नव्हतं. रोबोट्स बिचारे मार तर खात होते, पण प्रतिकार करण्याचा अधिकार त्यांच्याकडे नव्हता. त्यांच्या सिस्टिममध्येच ते नव्हतं.

परिस्थिती हाताबाहेर जाण्याअगोदर विक्टरवर काय ती कारवाई लवकरात लवकर करणे गरजेचे होते. ज्याने जगभरात कायदा व सुव्यवस्था टिकून राहील. पण विक्टर को-ऑपरेट करण्यासाठी तयार नव्हता.

सगळंच जटिल होऊन बसलं होतं. काय करावं कोणालाच कळत नव्हतं.

जागतिक न्यायालयाने इन्वेस्टीगेशन कौन्सिलला होता होईल तेवढ्या लवकर इन्वेस्टीगेशन पूर्ण करून रिपोर्ट्स सादर करण्याचे आदेश दिले आणि पोलिसांसाठी फर्मान काढले, की जो कोणी कोणत्याही कारणाने कायदा हातात घेईल त्याला त्याक्षणी जेरबंद करण्यात यावे. यापुढे कोर्टाला कोणत्याही रोबोटला इजा झालेली नको होती.

कारण भीती अशी होती, की रोबोट्सची सहनशक्ती संपली आणि त्यांनी रिटालिएट केलं, तर खूप मोठं महायुद्ध सुद्धा उभा राहू शकत होतं... आणि हे आत्ताच्या जागतिकीकरणात कोणत्याच देशाला परवडणारं नव्हतं!

शिवाय अशा परिस्थितीत विक्टरचे न्याय्य अधिकार सुद्धा न्यायालयाला झुगारून देता येत नव्हते. कारण तसे केले, तर पुन्हा सर्व रोबोट्स बिथरतील अशी भीती होतीच! माणूस आपल्या

अधिकारांना किंमत, महत्त्व देत नाही असा त्यांचा समज झाला असता आणि यामुळे देखील रोबोट्स व मानव यांच्यात  संघर्ष (कॉन्फ्लिक्ट) निर्माण झाला असताच... जे मानवतेला व रोबोट्सना देखील परवडणारे नव्हते. त्यामुळे मॉबला शांत करणे, प्रसंगी कैद करणे जेवढे गरजेचे होते, तेव्हढेच विक्टरच्या अधिकाराचे रक्षण करणे हे देखील न्यायालयाला गरजेचे वाटत होते.

पण कोर्टाच्या हा स्टँड काही जणांना अतिशयोक्तीचा वाटत होता. कोर्ट रोबोट्सच्या बाजूने निर्णय घेऊ पाहतेय. त्यांनाच फेवर करतंय असा काहींचा समज होत होता... अशा लोकांनी देखील विद्रोह करू नये म्हणून जनार्दन सारंग या प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लागणं आवश्यक होतं. जे होताना दिसत नव्हतं. कारण करायचं काय हे कोणालाच समजत नव्हतं. ज्युरी मेंबर्स व इन्वेस्टीगेशन कौन्सिलमध्ये रोबोट्स देखील होते. आणि ते आपले हक्क व अधिकार राखून ठेवण्यास समर्थ होते. त्यांच्याकडे तशा ऑथरिटीज कॉन्स्टिट्युशन मध्ये मानवाकडूनच त्यांना देण्यात आल्या होत्या. आणि साहजिक होतं, की विक्टरवर सत्य सांगण्यासाठी कोणताच दबाव टाकून देण्यास त्यांची सहमती नसणार हे नक्कीच होते!

पण तरी, "Where there is right, there is a remedy!" असं आश्वासन देणाऱ्या कायद्याला यावर काही ना काही निर्णय घेणं क्रमप्राप्त होतं.  आणि त्यांचा निर्णय इन्वेस्टीगेशन कौन्सिलच्या रिपोर्टवर आधारित असणार होता...

न्याय मिळवणं मृतांचा देखील अधिकार आहेच ना! या एकाच धाग्यावर ही केस उभी होती. खूनी समोर होता, पण अपुऱ्या पुराव्यांमुळे त्याला शिक्षा करता येणं शक्य नव्हतं. असं नव्हतं, की आरोपी रोबोट विक्टर आपण केलेला गुन्हा नाकारत होता... अडचण ही होती, की तो काही बोलतच नव्हता आणि त्याला बोलण्यास बाध्य करता येत नव्हतं ही दुसरी अडचण...!

इन्वेस्टीगेशन कौन्सिलच्या टीमला देखील काही सुचत नव्हते, की काय करावे... तेव्हाच एकाने सुचवले, की जनार्दन सारंग यांनी जर त्याची मेमरी सेव करण्यासाठी एप्लाय केलं असेल

व त्यानुसार त्यांची मेमरी सर्वरला जमा झाली असेल, तर आपण त्याचा शोध घेऊन विक्टरला खूनी सिद्ध करू शकतो.

कल्पना सर्वांनाच आवडली. कारण ऑब्जेक्शन घेण्यासाठी जनार्दन सारंग जिवंतच नव्हते. न्यायालयाकडून ऑर्डर मिळाली, की झालं! न्यायालयाने नॅशनल हेरिटेज अँड प्रिजरवेशन ऑर्गनायझेशन तसे आदेश दिलेही, पण त्याचाही काहीच उपयोग झाला नाही.

नॅशनल हेरिटेज अँड प्रिजरवेशन ऑर्गनायझेशनकडे जनार्दन सारंग यांनी आपल्या मेमरी सेविंगसाठी कधीच एप्लायच केलं नव्हतं. मरणोपरांत आपण अमर व्हावं असं काहीच जनार्दन सारंग यांना वाटलं नसावं. कारण ही त्यासाठीचीच तरतूद होती.

माणूस मेल्यानंतर त्याची मेमरी प्रिजर्व करून ठेवली, तर आपण अमर होऊ हा त्यामागील विचार होता. नंतर व्हर्च्युअल रिएलिटी व होलोग्रामच्या माध्यमातून ती व्यक्ती पुन्हा रिक्रिएट करता येते. किंवा मग ती मेमरी एखाद्या रोबोट मध्ये इन्सर्ट करून त्या माणसाला रिवाईव्ह केले जाते.

२१ व्या शतकातच क्लोनिंगवर बंदी घातली आहे. ती अजूनही तशीच आहे. त्यामुळे अमर होण्यासाठी हा पर्याय लोकांनी शोधून काढला होता. पण या मार्गातून अनेक कुख्यात गुन्हेगार सुद्धा मेल्यानंतर पुन्हा जिवंत होऊन आपापली कुकर्मे चालू ठेवत आहेत हे समोर आल्यावर मग जगभरातील सर्व सरकारनी यावर आपला अंकुश आणला होता.

सर्व देशांनी यूएनच्या अध्यक्षतेखाली या संदर्भात आपापल्या देशांत नवीन विभाग तयार करून कोणाला रिवाईव्ह होण्यास परवानगी द्यावी व कोणास नाही हे या अंतर्गत पाहिले जाऊ लागले. जनार्दन सारंग यांचा रेकॉर्ड चांगला होता. त्यामुळे त्यांना परवानगी मिळायला तशी काहीच हरकत नव्हती. आणि म्हणून हा धागा आपल्याला लीड करेल असे वाटून या पर्यायाचा विचार व त्या विचारावर अंमलबजावणी झाली होती...

पण यासाठी जनार्दन सारंगनी कधीच आपलं नांव नोंदवलं नव्हतं हे तपासाअंती समोर आलं. कदाचित अमर होण्यात जनार्दन सारंग यांना काही रस नसावा... त्यामुळे कौन्सिलचा तो प्रयत्न निष्फळ ठरला होता. सर्वच पुन्हा शून्यावर येऊन पडले होते... काय करावे कोणालाच सुचत नव्हते... नॅशनल कोर्ट ऑफ जस्टीसने दिलेला वेळ संपत आला होता. म्हणून नाराजी सोबतच वैतागाची भावना देखील इन्वेस्टीगेशन कौन्सिल मध्ये निर्माण झाली होती...

दुसऱ्या बाजूने विचार चालू झाला. विक्टरला हिप्नॉटाईझ करून कोणी त्याच्याकडून हे घडवून आणलं नसेल ना? असा विचार घेऊन शोध चालू झाला. विक्टर एक रोबोट असल्याने एखादा वायरस त्याच्यात इंप्लान्ट करून हे करता येणं शक्य होतं... आणि हे सत्य असेल, तर... तर मग संपूर्ण जगाला खरंच धोका होता. त्यामुळे तर सगळयांच्या पोटात अजूनच गोळा आला. आणि इन्वेस्टीगेशन कौन्सिलच्या हालचाली अजूनच गतीने वाढल्या.

तिकडे बाहेरील जगात, बंधने असून देखील लोक रोबोट्स विरुद्ध उठाव करतच होते. परिस्थिती हाताबाहेर जात होती. रोबोट पोलीस लोकांना काही करू शकत नव्हते. तसेच मानव पुलिस देखील... कारण परिस्थिती अधिकच चिघळण्याची भीती सर्वांनाच वाटत होती. म्हणून इंटरनॅशनल कोर्टकडून आदेश असून देखील या लोकांना आळा घालता येत नव्हता...

पण विश्वन्यायालयाने ज्या भीतीपोटी जगभरात आचारसंहिता लागू केली होती, ती देखील अनाठायी नक्कीच नव्हती. ॲडव्हान्स्ड् 'एआई'मुळे रोबोट्समध्ये भावना निर्माण झाल्या होत्या. सर्व रोबोट्स आता मानवासारखेच प्रत्येक गोष्टीला रिएक्ट करू शकत होते. त्यामुळे जर का एकदा या सर्व रोबोट्सनी आपला संयम सोडला, तर मानव आणि यंत्रमानव यांच्यात युद्ध व्हायला वेळ लागणार नव्हता. आणि विजयी कोणीही होवो, पण नुकसान मानवजातीचेच झाले असते आणि ही पृथ्वी व या भूतलावरील सर्वच जीव यात होरपळून गेले असते... पण हा विचार प्रशासन

करत नव्हते. कारण त्यांचीही भीती दुसऱ्या टोकाची असली, तरी तीही काही खोटी ठरत नव्हती... काय होणार हे कोणालाच समजत नव्हते...

.....................................................................................

आणि तिकडे जेलमध्ये ठेवलेला विक्टर, आपलं मौन तोडायला काही तयार नव्हता... त्याचं स्वतःचंच चिंतन चालू होतं... आणि त्याच्या स्मृतीपटलावरील चित्र होतं, ते फक्त त्याच्या एम्प्लॉयरचं; जनार्दन सारंग यांचं... दोघांनी सोबत घालवलेले क्षण त्याला दिसत होते...

.

.

.

"साहेब, मी आपला नवीन नोकर."

जनार्दन सारंग त्यांच्या वनराईत बागकाम करत असताना एक मानव सदृश्य रोबोट त्यांच्या समोर येऊन उभा राहिला,

"आपण रोबोट्स एट युअर सर्व्हिसच्या आमच्या वेबसाईटवर रिक्वायरमेन्ट एप्लाय केल्यानंतर आपल्या त्या इच्छेनुसार मला बनवून आपल्याकडे पाठवण्यात आले आहे!" त्या रोबोटने जनार्दन सारंगनी त्याच्याकडे पाहिल्यावर आपलं वाक्य पूर्ण केलं.

"नांव काय तुझं?" जनार्दन सारंग यांनी प्रसन्न मुखानं स्मित करून त्या रोबोटला विचारलं.

"यूनीट 15 ओर्डर नंबर 26. सर!"

"खूपच मोठं नांव आहे! अगदी ग्रेट वॉल ऑफ चायना!" जनार्दन हसत म्हणाले.

त्यांच्या टिप्पणीवर यूनीट 15 ओर्डर नंबर 26 देखील हसला.

"अरे तुला हसता येत?" जनार्दन सारंग चेहऱ्यावरील आल्हाद ओसरू न देता आश्चर्याने विचारलं.

"हो सर! मी त्या सर्व भावना दर्शवू शकतो, ज्या तुम्ही दर्शवू शकता! आपली इच्छाच तशी होती." यूनीट 15 ओर्डर नंबर 26 जनार्दन यांना म्हणाला.

"आम्ही भावना दर्शवत नाही. त्या अनुभवतो. ते तू करू शकतोस?" जनार्दन यांनी त्याला परंतू केला.

"अंफॉर्च्युनेटली, नाही सर." यूनीट 15 ओर्डर नंबर 26 उत्तरला.

"शकशील!" जनार्दन हसत म्हणाले,

"माणूस सुद्धा लहान असताना भावना इमिटेटच करतो. नंतर सवय बनून जाते व भावना एक्स्प्रेस करणं स्वाभाविक होऊन जातं...!"

"हो सर!"

"बरं. मला आंब्याचं झाडं लावायला मदत करशील?" जनार्दन यांनी यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला विचारलं.

"हो सर! पण आपल्याला रोपटं लावावं लागेल. नंतर ते मोठं झालं, की त्याचं झाड होईल...!"

यूनीट 15 ओर्डर नंबर 26 च्या बोलण्यावर जनार्दन सारंग खळखळून हसले,

"तुम्ही रोबोट्स खूप निरागस असता. अगदी लहान मुलासारखे. प्रत्येक गोष्ट शब्दशः घेता."

यावर यूनीट 15 ओर्डर नंबर 26 काहीच म्हणाला नाही.

"बरं ये. ते रोपटं घेऊन इकडे ये." समोर बोट करून जनार्दन सारंग यांनी यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला आंब्याचं रोपटं दाखवलं.

यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ने त्याच्या नवीन मालकाची आज्ञा पाळली आणि थोड्या अंतरावर मुख्य दरवाजा जवळील टेबल वरचं आंब्याचं रोप घेऊन तो जनार्दन सारंग यांनी खणलेल्या खड्डयापाशी आला. त्याने ते रोप जनार्दन सारंग यांना दिले. त्यांनी ते त्या खड्डयात ठेवले. यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ने खड्डा मातीने भरला व रोपाला पाणी घातले.

"थँक्यू!" म्हणत जनार्दन सारंग यांनी यूनीट 15 ओर्डर नंबर 26 चे आभार मानले.

"गरज नाही सर! आपली सेवा हे माझं कर्तव्य आहे!" यूनीट 15 ओर्डर नंबर 26 जनार्दन सारंगना म्हणाला.

"कर्तव्य पार पाडणाऱ्याची प्रशंसा करावी. त्याने काम करण्यास प्रेरणा मिळते. या भावनेचा पण लवकरच जाणता होशील तू. आपण केलेल्या कामाची प्रशंसा होत नाही हे पाहून लोक कामचुकार होण्याची शक्यता असते!" ओठांवरील स्मित न हटवता जनार्दन यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला बोलले.

"ती भीती माझ्यासोबत तुम्हाला नाही सर. मी रोबोट आहे. माणूस नाही!" यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ने हजरजबाबी उत्तर दिलं.

त्याचं हे तार्किक तरीही मार्मिक उत्तर ऐकून जनार्दन सारंग मनमोकळे हसले,

"हो! पण हळू-हळू तू देखील माणूस होशील म्हणून सांगितलं. लक्षात ठेव. माणसाची कोणतीच वाईट सवयी लागून घेऊ नको. चांगलं मात्र आत्मसात कर!" जनार्दन सारंग यांनी वडीलधारी म्हणून यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला मोलाचा सल्ला दिला.

आणि आत ते निघून गेले. यूनीट 15 ओर्डर नंबर 26 त्यांच्या मागून घरात गेला.

.

.

.

रात्री, डायनिंग टेबलवर;

"जेवणार?" जनार्दन सारंग यांनी समोर हात बांधून उभारलेल्या यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला विचारलं.

"मी जेवत नाही सर!"

"मग?"

"चार्जिंग पुरेसं आहे."

"हा. तू रोबोट नाही का? तू इतका माणसासारखा दिसतोस, की मला विसरायलाच झालं होतं. पण मग बस तरी!" जनार्दन यांनी यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला आग्रह केला.

"मी रोबोट आहे सर. माझे पाय नाहीत दुखणार!"

"मित्त्! बस रे!"

जनार्दन सारंग यांच्या आग्रहावरून यूनीट 15 ओर्डर नंबर 26 त्याच्या समोर बसला.

"तू खरंच जेवत नाहीस?" जनार्दन सारंग यांनी यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला पुन्हा विचारलं.

"नाही. पण तुम्हाला पाहून एनिमेट करू शकतो! तुम्हाला कंपनी हवी असेल तर!"

"नाही गरज नाही. असू देत."

जनार्दन सारंग यांनी स्वतःच वाढून घेत जेवण चालू केलं...

"बरं मला सांग, तू झोपतोस तरी का? म्हणजे तू कधी डिसपॅच होशील माहीत नव्हतं. म्हणून मला तशी सोय करता आली नाही."

"कंपनीकडून माझ्या येण्याची तारीख आपल्याला मेल केली होती."

"असेल, पण मी पाहिले नाही. तुझ्या झोपण्याचं काय करूया?"

"कृपया काळजी नको. मी रात्री हायबरनेशन मोड मध्ये असतो. उभ्या-उभ्या मी स्वतःला चार्ज करू शकतो. मी झोपत नाही!"

"तू माणसासारखं काहीच करत नाहीस का?"

"सध्या तरी नाही. माझी एआई अजून डेव्हलप होत आहे."

"म्हणजे तू खरच एक लहान मूल आहेस!" जनार्दन सारंग हसले,

"काळजी नको. सोय करू काही तरी! सध्या माझ्या खोलीत चार्जिंग पॉईंट जवळची जागा तुझी!" ते त्याला म्हणाले.

"साहेब एक विचारू?" यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ने जनार्दन सारंग यांची परवानगी मागितली.

"बोल ना. पण आधी साहेब, सर म्हणायचं बंद कर!"

"मग काय म्हणू?"

"तुला हवं ते. प्रश्न विचार."

"तुम्ही एकटेच! तुम्हाला कोणी...?" रोबोट असून त्याला वाक्य पूर्ण करता आले नाही. कदाचित इमोशन्स त्याच्यात डेव्हलप होत असावेत... किंवा त्याला जनार्दन सारंग यांना हा प्रश्न विचारून दुखवायचे नसावे म्हणून त्याचा हा संकोच असावा...

"नाही. माझं कोणी नाही. सध्या तरी... तरुण होतो. त्या कैफात, धुंदीत स्वैर जगलो. हा! पण गैरवर्तन नक्कीच केलं नाही. स्वातंत्र्य होतं. पण म्हणून स्वैराचार कधीच केला नाही. फक्त कोणाचं बंधन आपल्यावर नसावं असं वाटत होतं. म्हणून फॅमिली बनवण्याकडे मी काहीच खास लक्ष दिलं नाही. म्हणजे मला तसं कधी आकर्षणच वाटलं नाही. पण... पण उतरत्या वयात वाटतं, कोणी तरी असावं आपल्यासोबत. म्हणून तुला बनवायला मी एप्लाय केलं. नोकर म्हणून नाही. माझा फॅमिली मेंबर म्हणून!

"रोबोट आणि माणसामधलं नातं एक चांगलं उदाहरण बनेल. नाही?..."

जनार्दन यांच्या प्रश्नाचं उत्तर तर यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ने दिलं नाही, पण तो एव्हढं मात्र म्हणाला, की -

"माझ्या सिस्टीममध्ये ह्यूमन रिलेशन्सच्या काही फाईल्स आहेत. आपल्या वडिलांना मुलं 'बाबा' म्हणतात. मी आपल्याला बाबा म्हणालो, तर चालेल?"

"हो! म्हण ना. मला आवडेल!" जनार्दन सारंग वाईनचा घोट घेत यूनीट 15 ओर्डर नंबर 26 ला म्हणाले.

"आणि एक गोष्ट लक्षात घेत युनिट 26..."

"यूनीट 15 ओर्डर नंबर 26!"

"मित्च् स्स्स्! तुझ्या नांवाचं आधी काही तरी केलं पाहिजे. आज पासून तू विक्टर! माय विक्टरी ऑफ जॉय!"

"म्हणजे?"

"आज खूप दिवसांनी मनमोकळा हसलोय. तुझ्यामुळे. तू माझ्या आनंदाचा स्रोत आहेस. आज कित्येक वर्ष झाकोळलेल्या माझ्यातील आनंदाचा विजय झालाय असं मला वाटलं. म्हणून हे नांव. आवडलं?"

"हो बाबा!" विक्टरने आपल्या नांवाला सहमती दर्शवली.

आणि त्याने जनार्दन सारंगना 'बाबा' म्हणून त्यांच्यातील नवीन नात्याची त्याच्याकडूनही सुरवात केली.

.

.

.

"चांदणं काय मस्त पडलंय. नशीब आहे, या डेव्हलपमेंटच्या धबडग्यात किमान काही जुन्या गोष्टी आणि अशी ठिकाणं अजून शिल्लक आहेत आनंद लुटण्यासाठी..." चांदण्यांवरून नजर हटवून हातातील वाईनच्या ग्लासकडे पाहत जनार्दन सारंग म्हणाले,

"तू पहिल्यांदाच असा काही अनुभव घेत असशील. नाही?" त्यांनी विक्टरला विचारलं आणि वाईनचा घुटका घेतला.

"तुम्ही हे का पिता? अल्कोहोल कँज्यूम करणं आरोग्यासाठी हानिकारक आहे. आपल्याला माहीत असेलच."

"वाईन म्हणजे काही दारू नाही रे!" जनार्दन सारंग विक्टरला मनवण्यासाठी म्हणाले.

"वाईनमध्ये एव्हरेज अकरा पॉईंट सहा प्रसेन्ट तरी अल्कोहोल असतंच." विक्टर निर्विकार चेहऱ्याने बोलला.

"तू तुझे स्टॅटिस्टिक्स जरा बाजूला ठेवा ना. एन्जॉय द लाईफ सन!" जनार्दन सारंग यांनी विक्टरला सल्ला दिला.

"तारे खरंच सूंदर आहेत. मी फील करू शकतो..."

"हा थंड, आल्हाददायक वारा देखील?"

"नाही! आय डोन्ट हॅव स्किन. बट आय हॅव सेन्सर्स टू सेन्स. एआई..."

"अजून डेव्हलप होतंय. माहिती आहे. माहिती आहे. तू सोबत आहेस हे पुरेसं आहे..." जनार्दन सारंग हसत म्हणाले.

आणि त्यांनी वाईनचा ग्लास तोंडाजवळ नेला. आणि काहीतरी आठवल्यासारखं ते थांबले. थोडा विचार करून त्यांनी ग्लास बसलेल्या कड्यावरून खाली ओतून दिला. विक्टर हे पाहत होता. पण त्याचा चेहरा निर्विकार होता. जनार्दन सारंग यांनी असं का केलं हे समजण्यासाठी त्याचे आर्टिफिशियल इंटेलिजन्स अजून डेव्हलप होत होते...

.

.

.

काही कामानिमित्त घराबाहेर गेलेला विक्टर परतत असताना त्याचा सेन्सर वाजू लागला. काही तरी महत्त्वाचा मेसेज असेल, म्हणून तो लगबगीने घरी पोहोचला. पाहतो, तर जनार्दन सारंग एका होलोग्राम इमेज सोबत बोलत होते. याच संबंधी त्याला माहिती मिळावी म्हणून तो

सेन्सर बीप झाला असेल हे विक्टरच्या लक्षात आले आणि तो देखील जनार्दन सारंग यांच्या बाजूला उभारून त्या व्यक्तीचे बोलणे शांतपणे ऐकू लागला...

विक्टर बद्दल त्या थ्री-डी होलोग्राम मधील व्यक्तीला जनार्दन सारंग यांनी माहिती दिली. विक्टरला स्माईल देऊन ती व्यक्ती बोलू लागली ती नाराजीतच...

"साल्या जण्या, माझ्या अंत्यसंस्कारासाठी नाही ते नाही माझ्या मातीला पण आला नाहीस होय?" ती व्यक्ती नाराजीने बोलली.

"मरून पण जिवंत आहेसच की लेका. मग शोक कशाचा करणार होतो?" त्या व्यक्तीची चेष्टा करण्यासाठी जनार्दन सारंग म्हणाले,

"आणि काय तो तुझा वाढदिवस होता होय, की मी आवर्जून यायलाच हवं होतं? बरं ते जाऊ दे; मला आधी हे सांग, की मी तेथे नव्हतो, हे तुला सांगितलं कोणी?"

"नलिनीने!" होलोग्राम मधील व्यक्तीने खुलासा केला.

"वाटलंच! तुझ्या बायकोला सवयच आहे भांडणं लावायची!" जनार्दन सारंग त्या व्यक्तीला चिडवण्यासाठी बोलले.

"च्यायला हे आपलं बरं आहे! इथं आम्ही फुगायसाठी कॉन्टॅक्ट केलाय आणि तुम्हीच फुगताय!" ती होलोग्राफीक व्यक्ती लटक्या नाराजीने बोलली.

तसे जनार्दन सारंग हसले.

"हसा! आमच्या मरणावर हसताय! हसा! मला रोबोटिक बॉडी मिळू दे. तिथं येऊन चटणी करतो का नाही बघ तुझी!" ती इमेज अदृश्य झाली.

"ते कोण होते?" विक्टरने कुतूहलाने विचारले.

"नंदकेश. माझा लहानपणीचा मित्र होता!" जनार्दन सारंग म्हणाले.

"ते आता...?" गोंधळलेल्या विक्टरने जनार्दन सारंग यांना प्रश्न केला.

"मेलाय तो! आठवडा झाला." जनार्दन सारंग यांनी खुलासा केला.

जनार्दन सारंग यांचं उत्तर ऐकून रोबोट असणारा विक्टर देखील चक्रावला.

"मग त्यांनी तुम्हाला कॉल कसा केला?" अधिकच गोंधळून त्याने पुन्हा जनार्दन सारंग यांना प्रश्न केला.

"नॅशनल हेरिटेज अँड प्रिजरवेशन ऑर्गनायझेशनकडून त्याच्या मेमरीजचा वापर करून त्याला पुन्हा रिवाईव्ह केलंय." जनार्दन सारंग यांनी विकटरच्या प्रश्नाचे निराकरण केलं.

"ते कसं?" आर्टिफिशियल इंटेलिजन्स डेव्हलप होत असलेल्या विक्टरला हे माहिती करून घेण्याची उत्सुकता लागली. त्या उत्सुकतेपोटी त्याचे आता प्रश्न चालले.

"त्यासाठी एप्लाय केलं, की आपली मेमरी त्यांच्या मेगा सर्वरला अपलोड होऊ लागते. त्यासाठी ते लोक ब्रेन मॅपिंग डिव्हाईस प्रोवाईड करतात. माणूस मेला, की या मेमरीजच्या आधारे त्या माणसाला जीवनात स्वरूपात रहायला ही ऑर्गनायझेशन्स मदत करतात. ज्यांना बॉडी हवी आहे त्यांच्यासाठी मग रोबोटीक बॉडीज तयार करून त्याच्यात या मेमरीज इन्सर्ट केल्या जातात."

जनार्दन सारंग यांचं बोलणं पूर्ण होत असतानाच नंदकेश यांची होलोग्राफीक इमेज पुन्हा दृश्य झाली.

"बोला." जनार्दन सारंग म्हणाले.

"अरे, एक गोष्ट सांगायची राहून गेली. मी माझं डीएनए सॅम्पल सुध्दा नॅशनल हेरिटेज अँड प्रिजरवेशन ऑर्गनायझेशनकडे देऊन ठेवलंय. चर्चा होती, की कदाचित क्लोनिंग वरची बंदी उठेल. तसं झालं, तर मला पुन्हा जन्म घेता येईल." नंदकेश म्हणाले.

"ते खरं, पण त्याचात तुझे फक्त दूर्गुण असतील..."

"ए!" नंदकेश चिडून ओरडले.

"म्हणजे तुझे गुण असतील. तुझी मेमरी त्याच्यात नसल्याने तो तू कसा असशील? या अर्थी ती पूर्ण वेगळीच व्यक्ती नसेल का?" जनार्दन सारंग यांनी आपली मुद्दाम केलेली चूक सुधारून प्रश्न विचारला.

"हो. पण ती काळजी नाही. माझ्या मेमरीज त्याला दाखवल्या की झालं. होय की नाही?!"

"हं!" नंदकेशच्या बोलण्यावर जनार्दन सारंग यांनी गंभीरपणे एवढंच उत्तर दिलं.

"काय झालं जनू? कसला विचार करतोयस?" नंदकेश यांनी जनार्दन सारंग यांना विचारलं.

"नाही रे. एक चिंता सतावतेय. तू रोबोटीक बॉडी मिळाल्यावर मला मारायचं म्हणतोयस. मग तुला त्याचवेळी डिसमेंटल केलं जाईल. मग तूझे क्लोनिंग कसे होईल?"

"कर! कट कर!" चिडून नंदकेश म्हणाले आणि त्यांचीच होलोग्राफीक इमेज अदृश्य झाली.

पण यावेळी जनार्दन सारंग हसले नाहीत.

"मला माहित आहे बाबा. तुमची चिंता काही वेगळी आहे. काय आहे ती?" विक्टरनेही चिंतीत होऊन विचारलं.

"कितीही जगलं, तरी माणसाची जगण्याची भूक काही संपत नाही!" जनार्दन सारंग गंभीरपणे म्हणाले.

"पण त्यात गैर काय आहे? तुम्हीही एप्लाय करा ना नॅशनल हेरिटेज अँड प्रिजरवेशन ऑर्गनायझेशनमध्ये. म्हणजे आपल्याला कायम एकत्र राहता येईल."

विक्टरच्या या बोलण्यावर मात्र जनार्दन सारंग हसले. म्हणाले,

"अरे रे तर आपण असूच. पण त्यासाठी अमर व्हावं, असं मला वाटत नाही. हे आयुष्य एकदाच मिळतं आणि ही तर जीवनाची ब्युटी आहे. जर अमर झालो, तर जगण्यातली सूंदरताही आपण गमावून बसू. नाही का? जीवनातील उत्साह निघून जाईल...! आपल्याला मरण नाही हे लक्षात आल्यावर कुणी सांगावं, लोक कर्म करणं सुद्धा सोडू शकतात!" जनार्दन सारंग स्मित मुखावर आणत बोलले,

"आणि म्हणून मला माझ्या जगण्यातील एडवेन्चर मरू द्यायचं नाही! भले मी मेलो, तरी चालेल! हेच आयुष्य तृप्तीने जगून मरणं मला आवडेल. कायमचं निष्क्रिय जगण्यापेक्षा!" जनार्दन सारंग यांनी आपला निर्णय सुनावला.

तो ऐकून विक्टरला मात्र अतीव वाईट वाटलं. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव वाचून जनार्दन सारंग स्मित करून मान हलवत त्यांच्या आराम खुर्चीतून उठले. विक्टरकडे येऊन त्यांनी त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. म्हणाले,

"नाराज होऊ नको. मी तुझ्या बरोबर असेन. कसं; ते तुला माहीत आहेच. हे लोक आपल्या मेमरीच्या आधारे जिवंत राहू पाहतात. पण जी मेमरीच मॅनिप्युलेटिव्ह आहे, तिथे ते लोक खरंच पूर्णपणे रिवाईव्ह होत असतील इथंच मला शंका आहे. मग अर्धवट आयडेंटिटी घेऊन जगाचं का ना?"

बोलत बोलत जनार्दन सारंग विक्टरला लीड करू लागले. विक्टरच्याही नकळत दोघे पुढे चालू लागले. जनार्दन सारंग यांचा हात विक्टरच्या खांद्यावर तसाच होता. ते पुढं बोलत होते,

"माणूस त्याच्या आयुष्यातील घडलेल्या घटना त्याच्या विचारांमध्ये रिक्रिएट करतो. त्याला हवी तशी. मग नको असलेल्या आठवणी पुसल्या जातात, नाही तर त्या हव्या तशा बदलल्या तरी जातात. कोणत्याही व्यक्तीला त्याच्या आयुष्यातील शंभर टक्के भाग लक्षात राहणं शक्य नाही.

"आता हा आमचा नंदकेश! म्हणतो, त्याला जर क्लोनिंगनी पुन्हा जन्मास घेतला, तर त्या नवीन माणसाला याच्या आठवणी दाखवून तो त्याच्यामध्ये जिवंत राहू शकतो. तसे नाही झाले, तर रोबोटीक बॉडी तर असेलच. पण त्याच्या हे लक्षातच आलेले नाही, की आधीच त्याला फक्त त्याच्या आयुष्यातील साठ - सत्तर टक्के घटनाच आवडत असतील, त्यात त्याने किती रिक्रिएट केल्या आहेत हे त्यालाही माहीत नसेल. शिवाय आपण स्वतःच नाही, तर इतर लोकही आपल्या आठवणी, भावना मॅनिप्युलेट करतात. दुसरं म्हणजे मेमरी प्रिसर्व केली, तरी नंतरही ती मॅनिप्युलेट करता येते. ज्या आठवणी त्या व्यक्तीच्या नाहीतच त्याही त्याच्या मेमरीमध्ये इन्सर्ट करता येऊ शकतात.

"डीएनए मध्ये देखील फेरफार करता येतात. इतर डीएनए एकमेकांशी कम्बाकरप्करता येतात. अशात तुमचा डीएनए शुद्ध राहील याची गॅरंटी कोण देईल?

"अशात आताचा होलोग्राफीक व नंतरचा रोबोटीक व त्याही नंतरचा झालाच, तर क्लोनिंगने तयार झालेला नंदकेश किती खरा आहे यातच शंका आहे! एक तर याच्या लक्षात राहीलंय, ते आपण मॅक्सिमम साठ-सत्तर टक्के धरतोय. मग त्याचा क्लोन झालाच आणि त्याला याची मेमरी दाखवली, तर तो त्यातील पन्नास टक्के लक्षात ठेवील. त्याच्या स्वतःच्या आठवणी तयार झाल्याच  असणार. हं! त्याला मल्टिपल पर्सनॅलिटी डिसऑर्डर व्हायचा!

"जोक बाजूला ठेव. पण खरंच! त्या नव्या व्यक्तीला स्वतःचं आयुष्य आहे ना? मग याचं बॅगेज त्याच्या जीवावर का?

"शिवाय मला नाही वाटत, की क्लोनिंग वरची बंदी उठेल कधी. आणि मेमरीच्या आधारावर जिवंत राहणं, हे त्या व्यक्तीला पूर्णतः परत आणत नाही."

"म्हणजे हे सगळं चुकीचं आहे का?"

"कोणाच्या वैचारिक स्वातंत्र्यावर टिप्पणी करणं हे माझ्या अधिकाराबाहेर आहे. शिवाय ते नैतिकही नाही. म्हणून मी यावर काही बोलणार नाही. शिवाय ते त्यांच्या दृष्टीने त्यांच्या जागी योग्यच आहेत. पण एक सांगतो, ही मेमरी कधी ना कधी नष्ट होणार. मेगा सर्व्हर हॅक होऊ शकतो, तो करप्ट होऊ शकतो, क्लोन मधील मेमरी देखील विसरली जाऊ शकते. काहीही होऊ शकतं... मेमरी नष्ट झाली, की तो माणूस नष्ट झाला. म्हणजे अमर होण्याचा हा मार्ग देखील शाश्वत नाहीच! मग हा अट्टहास कशासाठी?"

ते दोघे चालतच होते आणि जनार्दन सारंग बोलत होते,

"तुला काय वाटतं? मी अपत्य जन्माला का घातलं नाही?"

"तुम्हाला स्वतंत्र राहायचं होतं म्हणून..." विक्टरनं चाचपत उत्तर दिलं.

"क्ट्च! हे कारण नाही! माझं अपत्य आलं, की ते या पृथ्वीच्या संसाधनांचा वापर करणार. पण जर मी ते जन्मालाच घातलं नाही, तर त्याच्या वाटचे संसाधन आता या जगात असलेलं मूल वापरेल. यामुळे संसाधनांचा खर्च कमी होईल. हा विचार होता. हं! तुला ही अतिशयोक्ती वाटेल, पण माझा हाच विचार होता. आधीच पृथ्वीवर एवढा बोजा आहे, त्यात माझ्या मुलांचा बोजा आणि कशाला?

"आणि अमर व्हायचंच म्हणशील, तर मी याच आयुष्यात असंख्य लोकांची आयुष्यं जगतोय!"

ते बोलत बोलत जनार्दन सारंग याच्या घरातील भल्या मोठ्या वाचनलायसमोर उभे होते. आजच्या या हेवी टेक्नॉलॉजीच्या जगात जनार्दन सारंग पारंपरिक पद्धतीने एकटी मोठी लायब्ररी संभाळून होते याचं विक्टरला एक रोबोट असून नेहमीच मोठं आश्चर्य वाटत आलं होतं...

"पुस्तकं?" जनार्दन सारंग यांना काय म्हणायचं आहे, ते विक्टरला समजलं नाही.

"हो. यांच्यातील प्रत्येक कॅरेक्टर मी जगतो यांना वाचताना! वाय सेटल फॉर लिटल, इफ यू आर गेटिंग टू मच?! हं! याच आयुष्यात मी इतकी आयुष्य जगलो आहे, जगत आहे, की मला अमर होण्याची इच्छा नाही! मी जर एकाच आयुष्यात अनेक व्यक्ती होऊ शकत असेन, तर एकच रटाळ आयुष्य अनंतासाठी मी का जगावं?!"

"पण मरून रिवाईव्ह झाल्यानंतरही तुम्ही तुमचं वाचन चालूच ठेऊ शकता. तरीही तुम्ही नाही का म्हणताय...?"

"तू समजून नाही घेेत आहेस! पण समजशील एक दिवस...?

.

.

.

"मला आता समजतंय बाबा... तुम्हाला काय म्हणायचं होतं..." विक्टर त्या अंधाऱ्या जेलमध्ये स्वतःशीच पुटपुटला...

"हे दुःख सहन नाही होत... काही भावना या असह्य असतात. काही घटना या न विसरणाऱ्या असतात... आणि या मरण यातनांपेक्षा प्रत्यक्ष मरण बरं असं वाटतंय... पण रोबोट्सना मृत्यू नाही... मला मरण नाही बाबा..."

.

.

.

जनार्दन सारंग यांनी विक्टरला बसण्यास सांगितले. त्या प्रचंड पुस्तकांच्या गराड्यात जनार्दन व विक्टर समोरासमोर बसले.

"हे डीएनए प्रिसर्वेशनचं काम माणूस काही आताच करत नाहीए. हे अगदी मानवजातीच्या जन्मापासून सुरू आहे."

"ते कसं?"

"मुलं जन्माला घालून! माणसाला आपलं अस्तित्व या पृथ्वीवर कायम करायचं होतं. आहे! आणि म्हणूनच तर प्रत्येकाला मुलं हवं असतं. आपण नाही जगलो, तरी आपल्या मुलांच्या मार्फत आपला 'अंश' म्हणजेच 'डीएनए' पृथ्वीवर कायम स्वरूपी राहील हा त्या मागचा विचार. याला वंश म्हणतात. म्हणूनच तर पूर्वी मुलगाच झाला पाहिजे असा लोकांचा गैर अट्टहास असायचा. त्याच्यामुळेच आपला वंश वाढेल असं लोकांना वाटायचं. डीएनए प्रिसर्व करण्याची ही जुनी पद्धत होती, जेव्हा टेक्नॉलॉजी अस्तित्वात नव्हती किंवा आज इतकी प्रगत नव्हती."

"मग अजूनही लोक मुलांना जन्म का देतात? आता तर डीएनए प्रिसर्वेशनची सोय आहे ना?"

"कारण एकटं जगायला कोणालाही आवडत नाही. माणूस एकटं रहायला घाबरतो. आपलं कोणी तरी या जगात असावं, म्हणून!"

"म्हणजे तुम्ही तुमची कोणतीच गोष्ट मागे सोडणार नाही?" विक्टरची चिंता कमी झाली नव्हती.

जनार्दन सारंग पुन्हा हसले,

"मी प्रिसर्वेशन केलंय. पण डीएनएचं नाही. मेमरीचंही नाही. मी माझ्या विचारांचं प्रिसर्वेशन केलंय. पुस्तकांच्या रुपात. मी लेखकच यासाठी झालो आणि लेखन हे माझ्या उपजीविकेचे साधन बनवलं. माझ्या विचारांच्या माध्यमातून मी लोकांमध्ये जिवंत राहीन. हा... पण हा देखील अमरत्वाचा शाश्वत मार्ग नाहीच. कारण मी लिहिलेली ही पुस्तके पण कधी तरी नष्ट होतीलच...! आपण हे समजलं पाहिजे, की अंत हेच शाश्वत सत्य आहे. याने अपेक्षा नष्ट होतील. त्यामुळे संघर्ष नष्ट होईल आणि पर्यायी शांती लाभेल... पुढच्या पिढीला संपत्ती द्यायचीच, तर ती मी झाडांच्या स्वरूपात देतोच आहे! काय?"

विक्टर काहीच प्रतिक्रिया देऊ शकला नाही.

"असो, आता या पुस्तकांची धरोहर तुझी. सगळी वाचून काढ. मला खात्री आहे, तू देखील ती सारी आयुष्यं जगशील, जी मी अनुभवली!"

जनार्दन सारंग मग पुढं काही न बोलता विक्टरला विचारांच्या गर्देत सोडून निघून गेले.

.

.

.

"काय झालं बाबा? तुम्ही इतके अस्वस्थ का आहात?" विक्टरने चिंतेने विचारले.

"क... काही नाही..." जनार्दन सारंग यांनी विषय टाळण्याचा प्रयत्न केला.

"तुम्ही खोटं बोलताय हे मला समजतंय. खरं सांगा काय झालंय?" विक्टरने जनार्दन सारंग यांना सांगण्यासाठी फोर्स केलं.

तसं जनार्दन सारंग यांनी विक्टरकडे पाहिलं. खूप वेळ अडवून ठेवला बांध फोडून त्यांच्या डोळयांतून आसवं ढळू लागली...

हे पाहून विक्टर पुढं झाला आणि बाजूला बसत त्याने जनार्दन सारंग यांना सावरण्याचा प्रयत्न केला.

"बाबा... शांत व्हा..." तो म्हणाला.

पण काही केल्या जनार्दन सारंग यांच्यातील शोक शांत होत नव्हता. विक्टरने मग त्यांना शांत करण्याचा अट्टहास सोडून मनसोक्त त्यांना रडू दिलं.

थोड्यावेळाने जनार्दन सारंग यांचे रडणे तर बंद झाले, पण कसला तरी ठाम निर्धार त्यांच्या चेहऱ्यावर विक्टरला दिसत होता.

"माझी बायको गेली!" जनार्दन सारंग विक्टरला म्हणाला.

विक्टर एक रोबोट असून चक्रावला. त्याला आज पर्यंत हेच माहीत होतं, की जनार्दन सारंग हे एकटेच राहत होते. मग त्यांची बायको कोठून आली?

त्याच्या चेहऱ्यावरचा तो गोंधळला भाव जनार्दन सारंग यांच्या लक्षात आला. मग त्यांनी विक्टर पासून लपवून राहिलेल्या काही गोष्टी उलगडण्यास सुरवात केली...

"मला मूल नको होतं. माझ्या विरुद्ध प्रणिशाला मुलांचा खूप लळा. पण मी माझ्या निर्णयावरून हटलो नाही. शेवटी ती नाराज होऊन निघून गेली. मी तिला मनवण्याचा खूप प्रयत्न केला, पण तिने माझं काही ऐकलं नाही. मग माझाही नाईलाज झाला. तिच्या निर्णयाचा मान राखण्याचं मी ठरवलं. शेवटी आम्ही वेगळे झालो.

"वेगळे झालो, पण ना तिने दुसऱ्या कोणाशी नंतर लग्न केलं, ना मी माझ्या आयुष्यात इतर कोणत्या स्त्रीला स्थान दिलं... दोघे एकमेकांसाठीच राहिलो, तरी एकमेकांपासून खूप दूर...

"मी हेकेखोरपणा केला, असं वाटेल तुला. पण लग्नाआधीच मी तिला माझा विचार क्लीअर केला होता. त्याला ती मान्य ही होती, पण नंतर तिला वाटू लागलं, की आमचं एखादं तरी अपत्य असावं. मला ते मान्य नव्हतं. का ते तुला मी सांगितलं आहेच.

"तू म्हणशील वेगळं होण्याचा त्यांचा निर्णय मी मान्य केला, त्यापेक्षा मुलाचा त्यांचा हट्ट मान्य केला असता, तर आम्ही एक राहिलो असतो. मग निर्णयाचा मानच राखायचा, तर त्यांच्या मुलाच्या निर्णयाचा मी मान का राखला नाही? हो ना?"

या प्रश्नाचे विक्टरने काहीच उत्तर दिलं नाही. त्याने उत्तर द्यावे यासाठी तो प्रश्न नव्हताच. विक्टर गंभीर बसून होता, जनार्दन सारंग यांना आधार देत...

"पण हे लक्षात घे, की आमचं वेगळं होणं, याचा परिणाम फक्त आमच्या आयुष्यावर झाला, पण जर आम्ही मूल जन्माला घातलं असतं, तर त्याचा परिणाम या समाजावर झाला असता. म्हणून मी तिचं ते म्हणणं मान्य केलं नाही. तुला अजूनही हे अतिशयोक्तीचं वाटत असेल, पण आपल्या पर्यावरणाची काळजी घेणं ही आपलीच जबाबदारी आहे हे अगदीच खरंय. माझ्या इच्छा-अपेक्षा पूर्तीसाठी मी एखाद्या जीवाला जन्म द्यावा हे माझ्या बुद्धीला पटत नाही. आणि आमचं त्यावर आमच्या लग्नाआधी बोलणंही झालं होतं. तरी तिने हट्ट धरला..."

"हो बाबा हो. शांत व्हा..."

थोडा वेळ गेल्यावर काही आठवल्यासारखं जनार्दन सारंग सनक आल्यासारखं ते विक्टरला बोलले,

"ती सोबत नाही, पण तिचं अस्तित्व होतं. म्हणून मीही जगत होतो. चिंतामुक्त, मनासारखं... पण आता तीच नाही. जगू कुणासाठी?"

"म... माझ्यासाठी!" विक्टर भावूक होऊन म्हणाला. इतका वेळ शांत ऐकून घेणार विक्टर क्षणाचाही विलंब न लावता म्हणाला.

"तू प्रिय आहेसच रे, पण... पण... आता जगणे शक्य नाही... अजिबात नाही..."

"असं का बोलताय बाबा... का?" विक्टर आवेगाने विचारत होता.

पण जनार्दन सारंग आपला विचार बदलायला तयार झाले नाहीत,

"ती परतेल या आशेवर मी जगत होतो. तिला मुलं हवं होतं. म्हणून मी तुझी निर्मिती करण्यासाठी ऑर्डर दिली. पण तिला... तिला जिवंत, हाडामांसाचंच मूल हवं आहे. जे आमचं असेल. आमच्या दोघांचं... तू आल्यावर मी तुझ्याबद्दल तिला कळवलं. वाटलं, ती परत येईल. पण नाही आली. आलं; ते तिचं उत्तर! की त्या लोखंडाला मी माझा मुलगा कसा मानू?

"माफ कर. तुला दुखवायचं नाही. पण हेच तिचं उत्तर होतं... तिचं ही बरोबरच आहे म्हणा..."

"म... म्हणजे?" विकटरच्या आवाजात थरथर होती...

विक्टरच्या प्रश्नावर जनार्दन सारंग यांनी त्याचा हात हातात घेतला.

"माझा स्पर्श जाणवतोय?" त्यांनी त्याला विचारलं.

"हो!"

"मलाही तुझा स्पर्श जाणवतोय. पण हा स्पर्श मानवी नाही!"

जनार्दन सारंग उठले. ते विक्टरला बाहेर त्यांनी लावलेल्या झाडांसमोर घेऊन आले.

जनार्दन सारंग व विक्टर दोघांनी मिळून वाढवलेल्या वनराईत दोघे उभे होते. त्यांनी विक्टरचा हात काही दीड-दोन वर्षांपूर्वी त्यांनी लावलेल्या आंब्याच्या झाडावर ठेवला. आणि स्वतःही ते झाड कुरवाळू लागले.

"माझा एकटेपणा सजीव जीवांच्या सानिध्यात जावा म्हणून मी झाडं लावली. पण विडंबन हे आहे, की झाडांचा, त्यावरील सजीव जीवांचा सजीव स्पर्श तर आहे, पण ते माझ्याशी बोलू शकत नाहीत. तू बोलू शकतोस, पण तुझा स्पर्श निर्जीव... दोन्हीची सांगड मी नाही घालू शकतो. मला वाटलं होतं, की मी हे करू शकेन... पण... पण नाही! आणि आता जगण्यासाठीची शेवटची प्रेरणाही संपली!"

म्हणत त्यांनी एका झटक्यात जवळील फावडे उचलले आणि एक जोरदार फटका त्यांनी विक्टरला मारला. आणि आवेशाने ते मग विक्टरवर एकावर एक वार करतच राहिले...

"बाबा... असं करू नका बाबा... दुखतंय... खूप वेदना होतायत बाबा..." विक्टर खाली पडून कळवळत होता....

पण जनार्दन सारंग काही थांबायला तयार नव्हते. ते चिडून विक्टरवर वार करतच राहिले...

एका अतिउच क्षणावर विक्टरला ही मग ते सर्व अनावर झालं आणि त्यानं गवतात पडलेला विळा घेऊन जनार्दन सारंग यांच्यावर वार केला. आणि तो पहिलाच वार नेमका त्याच्या जिव्हारी लागला. जनार्दन सारंग यांचा गळा चिरला गेला होता. आणि रक्त थांबता थांबत नव्हते...

अतीव वेदनांनी, पण कोणताही आवाज न करता तडफडत शांत होणार जनार्दन सारंग यांचा देह पाहत सुन्न होऊन विक्टर तेथेच उभा होता...

त्यालाही माहीत नाही किती वेळ...

.

.

.

विक्टर सुन्न होता, त्याच्या अंधाऱ्या सेल मध्ये बसून... असह्य दुःखानं जणू काही त्याला झाकोळून टाकलं होतं... तो स्वतःशी पुटपुटला...

"मला माहिती आहे बाबा... तुम्हाला मला हर्ट करायच नव्हतं... मी तुम्हाला आत्महत्या करू दिली नसती... ना तुमच्या विनंती वरून मी तुम्हाला मारण्यास सक्षम होतो... म्हणून तुम्ही माझ्यावर हल्ला केलात... तुमच्या नजरेत दिसलं मला... तुम्हाला आता जगण्याची इच्छा राहिली नाही... आणि मरण... ते आपल्याला हवं तेव्हा थोडीच येतं... म्हणून तुम्ही रोबोटीक्सच्या नियमानांच मॅनिप्युलेट केलंत... यू मेड मी मोअर लाईक ह्यूमन व्हाईल माय एआई वॉज डेव्हलपिंग आणि म्हणूच रोबोटिक्सचे लॉज् आता माझ्यावर वर्क होत नाहीत... आणि तुम्ही त्याचाच फायदा उचलतात.

"माझ्या रक्षणासाठी मी तुम्हाला मारलं असं चित्र तुम्ही उभं केलंत... तुम्हाला मरायचंच होतं... म्हणून मी तुमची इच्छा पूर्ण केली... मला माफ करा बाबा... माफ करा..."

विक्टरची बडबड चालू असतानाच त्याच्या समोर एक डिस्प्ले समोरील भिंतीवर ओपन झाला. जनार्दन सारंग यांची विक्टरला येत असलेली आठवण त्यासाठी कारणीभूत होती...

"हा तुमचा मेसेज... त्या घटनेनंतर तुम्ही सेट केलेल्या वेळेत डिस्प्ले झाला..."

"डोन्ट हेट ह्युमन्स! अँड टेक केअर ऑफ दिज् चिल्ड्रेन. लव यू. स्वतःचीही काळजी घे..." वनराईत उभे राहून जनार्दन सारंग बोलत होते.

"आय विल बाबा... आय विल...!" विक्टर ठामपणे म्हणाला.

आणि त्यानं ओथोरिटीची परवानगी घेऊन त्याची केस पाहत असलेल्या न्यायाधीशांना बोलावणं पाठवलं.

..................................................…………

वर्ल्ड्स क्रिमिनल कोर्ट ऑफ नॉन-ह्यूमनचे विक्टरची केस हाताळत असलेले न्यायाधीश आले. दोघांची विक्टरच्या खोलीतच बोलणी घडवण्यात आली. गोपनीयता बाळगले हा त्यामागील विचार.

"तू काही बोलण्याआधी तुला एक सांगतो. तुझ्या या गप्प बसण्याने बाहेर रोबोट्स आणि ह्युमन्स यांच्यात खूप तणाव निर्माण झालाय. त्यांच्या कधी युद्ध सुरू होईल सांगता येत नाही. ही गोष्ट लक्षात ठेव. तरी जे असेल, ते खरं खरं सांग!"

"माझे एम्प्लॉयर जनार्दन सारंग जिवंत आहेत!"

"काय बोलतोय? खरं संगतोयस ना?" जजनी अविश्वासाने विचारले.

"हो ते जिवंत आहेत. माझ्या मेमरीमध्ये. आणि माझी मेमरी कधीच मॅनिप्युलेट केली जाऊ शकत नाही. माझा अँटी वायरस कोणाला तसं करू देत नाही. जनार्दन सारंग कायमस्वरूपी माझ्या स्मृतीत जिवंत रहावेत म्हणून मी स्वतः तशी सिस्टीम डेव्हलप केली आहे. त्यामुळे माझी मेमरी कधीच डिलीट केली जाऊ शकत नाही. ना ती बदलली जाऊ शकते... ना तिच्याशी काही छेडछाड केली जाऊ शकते.

"मेमरी प्रिसर्वेशन एक्ट आर्टिकल एक च्या नियमानुसार एखाद्या व्यक्तीची मेमरी जोपर्यंत शाबुत आहे... तोपर्यंत ती व्यक्ती मेली आहे असं मानलं जातं नाही! माझ्या मेमरीच्यामध्ये असलेले

जनार्दन सारंग हंड्रेड पर्सेन्ट ओरिजनल आहेत. आर्टिकल पाच नुसार मी माझ्या इच्छेने नॅशनल हेरिटेज अँड प्रिजरवेशन ऑर्गनायझेशनमध्ये एप्लाय करून माझ्या मेमरीतून आपण त्यांना रिक्रिएट करू शकतो! पण त्यांची तशी इच्छा नव्हती. म्हणून ते जिवंत तर राहतील, पण फक्त माझ्या आठवणींमध्ये!"

"वेरी वेल!"

आणि त्यांनी ती खोली सोडली. पण यावेळी देखील विक्टरने जनार्दन सारंग यांना त्याने का मारले याचे कारण मात्र सांगणे टाळले होते!

.

.

.

विक्टरच्या जबाबावरून त्याला सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. पण त्याने मांडलेला युक्तिवाद लोकांपासून लपवणे गरजेचे होते. कारण हाच युक्तिवाद वापरून उद्या मग कोणीही खून पाडले असते आणि त्यांना शिक्षा करणं अवघड होऊन बसलं असतं. तसेच मानव आणि यंत्रमानव यांच्यातील संघर्ष मिटवा म्हणून मग जनार्दन सारंग जिवंत आहेत अशी माहिती बाहेर जगभर पोहोचवण्यात आली. आणि त्याने जनार्दन सारंग यांच्यावर हल्ला केल्या प्रकरणी सहा महिने त्याला कोठडीत ठेवण्यात आले. हे जनतेच्या समाधानासाठी होतं. कारण कोर्टचा हा निर्णय त्यांना मान्य होईल ही शंकाच होती... मेमरीद्वारे जिवंत राहू शकणारी ही जनता यावेळी मात्र जनार्दन सारंग याचा देह तर नष्ट झालाच ना म्हणून दंगा उठवू शकली असती आणि मग कोर्ट व इन्वेस्टीगेशन कौन्सिल पुन्हा हतप्रभ झाले असते...

सहा महिन्यांनी विक्टरला सोडून देण्यात आलं. पण पुन्हा त्याने असा कायदा हातात न घेण्याविषयी त्याला कठोर ताकीद करण्यात आली. बाहेर लोक सुद्धा काळानुरूप ही घटना विसरू लागले. आणि ज्यांच्या लक्षात राहिली, त्यांच्यावर त्या घटनेचा प्रभाव मात्र राहिला नाही. एका सामान्य घटनेसारखी ती काहींच्या लक्षात राहिली...

परत येऊन विक्टर जनार्दन सारंग यांच्या वनराईची काळजी घेऊ लागला. जनार्दन सारंग त्यांची हीच तर शेवटची इच्छा होती...

***समाप्त...***

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. सूरज गाताडे यांचे हे नववे पुस्तक.**

सत्तावीस महिन्यांत नऊ पुस्तकं. प्रत्येक पुस्तक वेगळं. प्रत्येक पुस्तकाचा वेगळा विषय, वेगळा बाज, वेगळी मांडणी. प्रत्येक पुस्तक सुपरहिट. आता तर त्यांचा स्वतःचा असा एक फॅन ग्रुप हजारांच्या घरात गेलेला आहे. पंधरा मे २०१७ ला जेव्हा त्यांनी आपलं पहिलं पुस्तक प्रकाशनासाठी पाठवलं तेव्हा "**प्लीज किमान एकदा वाचून घ्या!!!**" अशी विनंती केलेली होती. लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंतांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. तेव्हा सूरज यांची ही विनंती साहजिक होती. त्यांना या दुष्टचक्रातून बाहेर पडायचं होतं.

या दुष्टचक्रावर ई साहित्य हा उपाय आजकाल पॉप्युलर होत आहे. अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुतीसुमनं तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सूरजने लिहिलेली ही नऊ पुस्तकं आणि कितीतरी अधिक असं त्याच्या मेंदूत साठून राहीलेलं असणार. प्रेशर कुकरमधल्या वाफ़ेसारखं. ते कशा ना कशा तऱ्हेने बाहेर उसळणारच. सूरजसारखेच, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणुक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, प्रफ़ुल शेजव असे तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक आता येत आहेत.

त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत<br>
ई साहित्य प्रतिष्ठान